INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 11 | DECEMBER – 2024

# नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी
## (विशेष संदर्भ : अध्यापन कार्यातील कामगिरी )

**प्रा.डॉ.सोमगोंडे एन.एस.**
**राज्यशास्त्र विभागप्रमुख , जवाहर महाविद्यालय, अणदूर**
**ता.तुळजापूर,जि.धाराशिव.**

**सारांश :-**

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये सामाजिक व राजकीय स्तरावर अनेक समाजसुधारक होऊन गेले. त्यापैकी नामदार गोपाळकृष्ण गोखले हे एक महत्वाचे व्यक्तिमत्व होय. त्यांनी सामाजिक व राजकीय, आर्थिक इ. घटकावर विचार मांडलेले दिसुन येतात. तसेच विविध क्षेत्रामध्ये त्यांनी केलेले कार्य महत्वपूर्ण आहे. त्यापैकी त्यांनी शैक्षणिक कार्यामध्ये ही महत्वाचे योगदान दिलेले आहे. त्यांनी केलेल्या अध्यापनकार्यात व शिक्षणक्षेत्रात केलेल्या कामगिरीचा, आपल्याला सध्याच्या युगामध्ये नक्कीच उपयोग होऊ शकतो.



**उद्देश :-**

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीचा अभ्यास करणे

**व्याप्ती:-**

प्रस्तुत शोध निबंधाची व्याप्ती आधुनिक भारताचे नेते नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचा कार्यकाळ आहे.

**मर्यादा :-**

प्रस्तुत शोधनिबंधाची मर्यादा नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील अध्यापन कार्यातील कामगिरपुरतीच मर्यादित आहे.

## संशोधन पध्दती व साधने

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला असुन नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्यावरील प्रकाशित साधनांचा वापर केला.

## प्रस्तावना :-

आधनिक भारताच्या प्रारंभाकालीन राजकीय जडणघडणीत उपक्रमात नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे. विधायक स्वरूपाच्या आधुनिक भारतीय प्रबोधन युगाचे ते प्रणेते नसले तरी महत्वाचे प्रतिनिधी आणि प्रवक्ते म्हणून नामदार गोपाळकृष्ण गोखले यांना मानले जाते. शोधनिबंधासाठी नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या विविध कामगिरीपैकी त्यांच्या शैक्षणिक कार्याविषयक (विशेष संदर्भ : अध्यापन कार्यातील कामगिरी ) हा विषय निवडण्यात आला आहे.

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी राजकीय, आर्थिक, सामाजिक सुधारणा इ.महत्वपूर्ण कार्य केलेले दिसून येतात. त्यापैकी शैक्षणिक कार्यामध्ये त्यांचे योगदान महत्वपूर्ण दिसून येते. अध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांनी घडवून आणलेले बदल, विविध प्रसंग यावर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न हया शेधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

## नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचा परिचय : -

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील एका छोटयाशा खेडयात कोतळुक या गावी 9 मे 1866 मध्ये झाला. कोकणातील निसर्गाच्या मांडीवर गोपाळ खेळत होता, लोळत होता कोकणातील शुद्धपणा त्यांच्या रोमारोमात भरत होता. त्यानंतर त्यांची आई सत्यभामा गोखले लहान गोपाळला घेऊन कागलला आल्या. ना.गोखले यांचे मराठी शिक्षण कागलला झाले. त्यानंतर इंग्रजी शिक्षणासाठी त्यांना कोल्हापुरला पाठविण्यात आले. 1881 साली अवघ्या पंधरा वर्षाचे असताना ते मॅट्रीकची परीक्षा पास झाले. अठराव्या वर्षी डेक्कन कॉलेजातून बी.ए.ची.परीक्षा पास झाले. त्यांनी गणित या विषयात विशेष योग्यता प्राप्त केली. त्यांच्या विचारांवर त्यांचे गुरू न्यायमूर्ती रानडे यांचा प्रभाव असलेला दिसुन येतो.

## अध्यापनातील कामगिरी :-

### 1. नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे शैक्षणिक मत : -

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांना शिक्षणविषयक आस्था होती.

भारतात इंग्रजी शिक्षणानी ज्या समस्या निर्माण झाल्या होत्या, त्याची जाणीव गोखल्यांना होती. राष्ट्राला उदयाला यायचे असेल आणि प्रगती करायची असेल तर ती फक्त विकसित आणि ध्येयनिष्ठ अशा शिक्षण पध्दतीतुनच होऊ शकते असे ते म्हणत. आधुनिकीकरणाकडे जाण्याचा एक चांगला मार्ग म्हणजे शिक्षण असे म्हणत. 1902 अंदाजपत्रकी अधिवेशनात भाषण करतांना गोखले म्हणाले होते की,

सार्वत्रिक शिक्षणाचा विचार योग्य व्हायला पाहीजे. 10 मुलांपैकी 9 मुले अज्ञानात आणि अंधारात वाढतात आणि प्रत्येकी 5 खेडयापैकी 4 खेडी ही शाळाविना आहेत.1

### 2.अध्यापन कार्यासाठी स्फुर्ती :-

1886 साली ते वासुदेव केळकर फक्त वर्गाच्या दिवशी मुंबईत जात 'पुण्यास राहुनच ते भरीत, असे वाटते की, फर्डे इंग्लीश बोलणारा वकील व्हावे, हीच त्यांच्या मनातील इच्छा दिसते. परंतु देवाची इच्छा दुसरीच होती. गोपाळरावांच्या हातुन सर्व देशाची वकिली व्हावयाची होती. ते टिळक-आगरकरांच्या सहवासात होते.

विशेषत: आगरकरांच्या मध्ये आणि त्यांच्या मध्ये साम्य होते. कष्टदशेतुन दारिद्रयाच्या पंकातून आगरकर रूपी सुंदर कमल देशास लागले होते. गोपाळरावांची स्थितीही गरीबीचीच होती. त्यामुळे आमरण गरीबीतीच जन्म कंठुन अध्यापकवृत्तीने पुरातन ऋषीप्रमाणे व्रताचरण करावयाचे हा आगरकरांचा उज्वल मार्ग अनुसरण्याची अंधुक स्फुर्ती त्यास झाली असेल.

### 3.अध्यापनाची स्थलदर्शक पध्दत :-

गोपाळरावांचे कॉलेजातील काम जोराने चालू झाले. त्यास प्रिव्हीयसचे इंग्लिश शिकवावयास दिले. त्यावर्षी सौदीचे लोकप्रिय नेल्सनचे चरित्र अभ्यासासाठी होते. नेल्सन दर्यावर्दी अधिकारी होता. देशावरच्या पुष्कळशा विद्यार्थ्यांनी समुद्र पाहिलेला सुध्दा नसतो. त्यांना प्रचंड गलबतांची कल्पना नसते. गोपाळराव या गलबतांचे यथार्थ स्वरूप समजण्यासाठी स्वत: मुंबईत जाऊन ही माहिती मिळवून येत आणि मग विद्यार्थ्यांना देत.

वरील उदाहरणांवरून नामदार गोपाळकृष्ण गोखले कर्तव्यनिष्ठ व स्वत:च्या कामाशी प्रामाणिक होते हे स्पष्ट होते.

### 4. फर्ग्युसन कॉलेजमधील जबाबदारी :-

फर्ग्युसन कॉलेजमधील आपल्या कारकिर्दीला गोखल्यांनी इंग्लीश साहित्याचे अध्यापक म्हणून सुरवात केली. 1890 मध्ये टिळकांनी राजीनामा दिल्यांनतर गणिताचे वर्ग घेण्याची गोखल्यांना विनंती करण्यात आली. एलफिन्स्टन कॉलेजात गोखल्यांचे सहाध्यायी असलेले धोंडो केशव कर्वे पुढील वर्षी फर्ग्युसनला येऊन मिळाले व गणित विषयाची जबाबदारी त्यांनी उचलली. इंग्लीश साहित्याच्या जागी गणित, गणिताच्या जागी इतिहास व अर्थशास्त्र विषय शिकवण्यात आला. त्यांनी काहीही अडचण वाटत नसे असे दिसते. अंकगणिताचे त्यांनी तयार केलेले एक छोटे क्रमिक पुस्तक लोकप्रिय ठरले. या पुस्तकावर त्यांना अनेक वर्षी रॉयल्टी मिळत राहीली. त्यामुळे आर्थिक चिंता कायमची मिटली.

वरील कारणावरून असे स्पष्ट होते की, वेळप्रसंगी कुठलीही जबाबदारी त्यांच्या वाटयाला आली तर ते स्विकारतात व ती पूर्ण करत असे.

### 4. नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या काही विद्यार्थ्यांच्या प्रकाशित आठवणी : -

गोखले वर्गात क्वचितच हास्य विनोद करीत मात्र शिकवण्यामध्ये अधुन मधुन विनोदाची प्रेरणा न केल्याने त्यांची काही अडचण झाली असे दिसत नाही. गोखले विद्यार्थ्याचे आवडते होते.

विद्यर्थ्याशी त्यांचे संबंध मनमोकळ होते आणि त्यांचा विद्यार्थ्यांना आधार वाटे. त्यांच्या भावोत्कट आणि सुस्पष्ट शिकवण्याने विद्यार्थी मंत्रमुग्ध होत. तास संपल्याची सुचना देणारी घंटा पुष्कळदा मनामध्ये तीव्र निराशा उत्पन्न करीत असे, त्यांच्या एका विद्यार्थ्याने म्हटले आहे.

### 5.विषयाचा व्यासंग व प्रभुत्व :-

कोणता विषय घाईघाईने आटोपून टाकण्याची त्यांची पध्दत नव्हती. प्रत्येक उतारा ते समजावून देत. प्रत्येक मुद्याचा सर्व बाजूंनी विचार करीत चोख मराठीतून ते उत्तम बोलत लिहीत असले तरी इंग्लीश् भाषा हे त्यांचे खरे माध्यम होते. इंग्रजी भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. डौलदार इंग्रजीत बोलत लिहीत. जॉन स्टुअर्ट मिल, एडमंड बर्क आणि जॉन मोर्ले यांच्या ग्रंथाचा त्यांना गाढ व्यासंग होता. त्यांच्या तरल संवेदनशील गनाला सुडौल इंग्लीश शैलीची इतकी भुरळ होती की, एखाद्या अनोळखी व्यक्तीने चांगल्या इंग्लीशमध्ये पत्र पाठवले तर त्या व्यक्तीविषयी त्यांचा पहिला गृह फार अनुकूल बने. या त्यांच्या दुबळेपणाची कधी-कधी त्यांना जबर किंमत द्यावी लागली. मेकॉले या बर्कच्या रैलीचे अनुकरण करून फडर्या इंग्लीशमध्ये पत्र लिहून त्यांचे मन जिंकलेल्या लुच्या व्यक्तीची आपल्या मानगुटीवरील पकड सोडविणे त्यांना अवघड जाई.

वरील उदाहरणावरून असे म्हणता येईल की, गोखले केवळ एखादा विषय केवळ आपले काम आहे. म्हणून विषय पूर्ण करत नसत तर सर्व बाजुंचा विचार करून तो स्पष्ट करत असे व मराठी व इंग्रजी या दोन्ही विषयांवर त्यांची असलेली पकड दिसून येते.

### उपसंहार :-

उपरोक्त सर्व विवेचनावरून असे म्हणता येईल की, नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे शिक्षणातील ध्येय व उद्दिष्टे ठरलेली असत. विद्यार्थी व विषय यांचा योग्य ताळमेळ घालुन सर्व बाजूंनी विचार करून मगच तो स्पष्ट करत.

स्थल, काळ यांचा योग्य समन्वय साधुन त्याचे कार्याचे नियोजन वैशिष्टपूर्ण असलेले दिसून येते. प्रा.गोखले हे त्यांच्या पेशाशी व कार्याविषयी कर्तव्यनिष्ठ व एकनिष्ठ असलेले दिसते. त्यांचा कर्तव्यनिष्ठपणा व प्रामाणिकपणा शिक्षण विषयक त्यांची आत्मीयता ही सध्याच्या शिक्षपध्दतीस आवश्यक वैशिष्टयपूर्ण बाब आहे असे वाटते.

### संदर्भ -

1. साने गुरूजी (2011) नामदार गोपाळकृष्ण गोखले, कोल्हापूर रिया पब्लिकेशन, पृष्ठ क्र. 37
2. देशपांडे श्रीकांत (1992) भारतीय राजकीय विचारवंत, नागपुर, मंगेश् प्रकाशन , प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्र.207
3. कित्ता पृष्ठ क्र.207
4. कित्ता पृष्ठ क्र.214
5. कित्ता पृष्ठ क्र.215
6. साने गुरूजी, उपरोक्त पृष्ठ क्र.48
7. कित्ता पृष्ठ क्र.48